मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
www.rajdand.com
। पश्चिम महाराष्ट्र ।
follow us : /rajdandlive

RNI Regd No.72105/99 ✻ वर्ष २५ ✻ अंक २९९ सातारा मंगळवार दि १६ जुलै २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/





# विधानसभा निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी

## बारामतीत अजित पवारांचे शक्तिप्रदर्शन

**बारामती :** लोकसभा निवडणुकीमध्ये झालेल्या पीछेहाटीनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. रविवारी (दि. १४) बारामतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने जनसन्मान रॅली आयोजित करून या महामेळाव्याच्या माध्यमातून पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आगामी बारामती विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने हे शक्तिप्रदर्शन केले आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने अर्थमंत्री अजित पवार यांनी राज्यातील शेतकऱ्यांचे विज बिल माप करण्याची घोषणा केली आहे. या अर्थसंकल्पामध्ये महिलांसह विद्यार्थी व शेतकऱ्यांना भरघोस मदत जाहीर केल्याने या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी शासकीय यंत्रणांसह राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीचे कार्यकर्ते सक्रिय झाले आहेत. बारामती शहर व तालुक्यामध्ये राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या माहितीचे फलक ठीक ठिकाणी लावले आहेत.

रविवारी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या पुढाकारातून बारामती शहरातील मिशन हायस्कूल ग्राउंड या ठिकाणी जनसन्मान मेळावा झाला. या मेळाव्यास पुणे जिल्ह्यासह राज्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते. राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ , प्रफुल्ल पटेल, धनंजय मुंडे, खासदार सुनेत्रा पवार, बाबा सिद्दिकी, सुनील तटकरे यांच्यासह इतर नेते व पदाधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार यांनी भर पावसात या अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची माहिती देत इतरही जाहीर केलेल्या निर्णयाची माहिती दिली. आपण महायुतीच्या माध्यमातून या राज्यातील महिलांसह शेतकरी व अन्य घटकांना न्याय दिला असल्याचे आपल्या भाषणात स्पष्ट केले.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत सुनेत्रा पवार यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव झाल्याने, या पराभवाची कारणमीमांसा शोधताना संविधान बदलाच्या इंडिया आघाडीने केलेल्या प्रचाराचा मुद्दा महत्त्वाचा असल्याचे स्पष्ट झाले. तसेच विरोधकांकडून चुकीचे नेरेटीव्ह पसरवले जात असल्याचा आरोप करून यावर विश्वास ठेवू नका, विकासाच्या बाबतीत आपण कधीच कमी पडणार नाही, असा ठाम विश्वास त्यांनी या सभेत दिला.

**बारामतीतील मतदारांना आश्वासित करण्याचा प्रयत्न**

राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांच्यासह सुनील तटकरे, बाबा सिद्दिकी या नेत्यांनी देखील अजित पवार यांच्या कार्याचे कौतुक केले. हा अर्थसंकल्प महाराष्ट्राला पुढे नेणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त करताना अजित पवार यांनाच त्यांनी प्रमोट केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे यापूर्वीचे राज्यस्तरीय मेळावे जिल्ह्याच्या ठिकाणी संपन्न झाले आहेत. बारामती मध्ये राज्यस्तरावरचा हा मेळावा मुद्दाम बारामतीत आयोजित करून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामतीतील मतदारांना आश्वासित करण्याचा प्रयत्न केल्याचे या मेळाव्यावरून दिसून आले. दरम्यान आगामी विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसला सर्वाधिक जागा मिळाव्या, यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोर्चेबांधणी सुरू केल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.

# लोकसभेनंतर राज्यसभेतही भाजपचे संख्याबळ घटले

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकांमध्ये ४०० पारचा नारा दिला होता. पण महाराष्ट्र, बिहारसह अनेक राज्यांमध्ये भाजपला मोठा फटका बसला. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मित्रपक्षांच्या बळावर सत्ता तर स्थापन केली पण तिसऱ्या कार्यकाळात भाजपला स्वबळावर बहुमत मिळवता आले नाही.

राज्यसभेचे चार नामनिर्देशित खासदार राकेश सिन्हा, राम सकल, सोनल मानसिंग आणि महेश जेठमलानी हे निवृत्त झाले आहेत. त्यामुळे लोकसभेनंतर आता राज्यसभेतही भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएचे संख्याबळही कमी झाले आहे. तर राज्यसभेत सध्या २२६ खासदार आहेत. अजूनही १९ जागा रिक्त आहेत. राज्यसभेतील संख्याबळानुसार भाजप सर्वात मोठा पक्ष आहे. यात भाजपचे एकूण ८६ सदस्य आहेत. तर एनडीए कडे ही संख्या१०१ इतकी आहे.

**खर्गे यांची खुर्ची धोक्यात ?**

सध्याच्या काळात काँग्रेसच्या राज्यसभेत २६ जागा आहेत. अशा स्थितीत राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपदाच्या खुर्चीबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपद मिळवण्यासाठी किंवा कायम ठेवण्यासाठी सभागृहाच्या एकूण संख्याबळाच्या १० टक्के संख्या आवश्यक असते. राज्यसभेत विरोधी पक्षनेतेपदासाठी किमान २५ जागांची आवश्यकता असते. सध्या संख्याबळाच्या बाबतीत काँग्रेसकडे पुरेसे संख्याबळ आहे. तथापि, येत्या काही महिन्यांत एनडीएला राज्यसभेच्या ११ पैकी ८ जागा मिळण्याची शक्यता आहे. तर ३ जागा इंडिया आघाडीच्या खात्यात जाऊ शकतात.



**विधेयक मंजूर करण्यात अडचणी येणार ?**

**राज्यसभेतील भाजपचे संख्याबळ पूर्वीपेक्षा कमी झाले आहे. त्याचा परिणाम विधेयक मंजूर होण्यावरही दिसून येणार आहे. मात्र, राज्यसभेत सध्या ७ नामनिर्देशित सदस्य आहेत. सध्या ते अलिप्त असल्याचे सांगितले जात आहे. याशिवाय दोन अपक्ष सदस्यही आहेत. भाजपला यापूर्वी या सदस्यांचा पाठिंबा मिळाला आहे. त्याचबरोबर अखअञ्वघ आणि धडठउझ हे देखील भाजपच्या जवळचे मानले जातात. गरज पडल्यास ते राज्यसभेत सरकारला साथ देऊ शकतात.**

**१२ खासदारांना मिळणार उमेदवारी**

**राज्यसभेत १२ सदस्यांना राष्ट्रपती नामनिर्देशित करतात. राज्यसभेत सध्या ७ सदस्य आहेत. चार सदस्य शनिवारी (१४ जुलै) निवृत्त झाले. येत्या काही दिवसांत जम्मू-काश्मीरमधून ४ उमेदवार येणार आहेत. तर आसाम, बिहार आणि महाराष्ट्रात २-२, हरियाणा, तेलंगणा, मध्य प्रदेश, राजस्थान आणि त्रिपुरामध्ये १-१ आहेत.**

# होर्डिंगवरून रेल्वेला दणका !
# पालिकेचे नियम पाळावेच लागतील


**सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश**

**मुंबई :** होर्डिंगबाबत मुंबई महापालिकेने आखलेल्या धोरणांचे तसेच आकाराबाबतच्या नियमांचे तसेच आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण म्हणून पालिकेने बजावलेल्या नोटिसांचे देखीलरेल्वेप्रशासनाला तंतोतंत पालन करावेच लागेल, असे सक्त निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.



घाटकोपरमधील छेडानगर परिसरात १३ मे रोजी महाकाय होर्डिंग कोसळून मोठी दुर्घटना घडली होती. हे होर्डिंग रेल्वे पोलिसांच्या हद्दीत होते. त्यानंतर मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वे हद्दीतील नियमबाह्य आकाराचे म्हणजे ४० फूट बाय ४० फुटांपेक्षा अधिक आकाराचे सर्व होर्डिंग रेल्वे प्रशासनाने तातडीने हटवावेत, अशा आशयाची नोटीस पालिका प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापन अधिनियमांतर्गत व मुंबई जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष या नात्याने अतिरिक्त पालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी बजावली होती. मुंबईची भौगोलिक स्थिती तसेच समुद्र किनाऱ्याला लागून असलेला प्रदेश लक्षात घेता पर्यायाने हवामान व वाऱ्याची स्थिती पाहता ४० फूट बाय ४० फुटांपेक्षा अधिक आकाराचे जाहिरात फलक लावण्यास पालिका परवानगी देत नाही. मात्र, रेल्वे प्रशासनाच्या हद्दीत नियमबाह्य आकाराचे होर्डिंग उभारल्याचे आढळून आले. घाटकोपरमधील दुर्घटनेची पुनरावृत्ती अन्य ठिकाणी होऊ नये, यासाठी रेल्वे प्रशासनाच्या हद्दीतील ४० फूट बाय ४० फुटांपेक्षा अधिक आकाराचे सर्व जाहिरात फलक तातडीने काढण्याचे निर्देश मुंबई जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण या नात्याने देण्यात आले आहेत.नोटिसांचेही तंतोतंत पालन करण्याच्या सूचनामात्र, रेल्वेने ही नोटीस तसेच होर्डिंगच्या आकाराच्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयात विशेष याचिका दाखल करून आव्हान दिले होते. त्यावर १० जुलै २०२४ रोजी सुनावणी घेऊन न्यायालयाने निर्देश दिले. त्यानुसार होर्डिंग आकाराबाबत पालिकेच्या नियमांचे तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण या नात्याने बजावलेल्या नोटिसांचे पालन करणे आवश्यक आहे.

## प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत एक रुपयात पीक विमा भरण्यासाठी ३१ जुलैपर्यंत मुदवाढ



**मुंबई :** प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत एक रुपयात पीक विमा भरण्याची आज- दि. १५ जुलै ही अंतिम मुदत होती. मात्र राज्यातील अनेक शेतकरी अद्यापही काही कारणामुळे पिक विमा भरण्यापासून वंचित असल्याने त्यांना संधी मिळावी यासाठी पिक विमा भरण्यास मुदतवाढ मिळावी अशी मागणी राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्र सरकारकडे केली होती. त्यांच्या मागणी नंतर ही मुदत ३१ जुलै पर्यंत वाढवण्यात आली.

सध्या राज्यात विविध योजनांसाठी लाभार्थींची कॉमन सर्विस सेंटरच्या केंद्रांवर गर्दी होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अर्ज व लागणारे कागदपत्रे जोडताना सर्व्हरची गती मंद झाली आहे. अद्याप ही अनेक शेतकरी पिक विमा योजनेपासून वंचित आहे त्यामुळे पिक विम्याचा अर्ज करण्यास मुदतवाढ मिळावी यासाठी राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने पत्र व्यवहार करण्यात आला. तसेच असून मंत्री धनंजय मुंडे स्वतः याबाबत पाठपुरावा करत होते. त्यानुसार सोमवारी संध्याकाळी एक रुपयात पिक विमा भरण्याचे मुदत ३१ जुलै पर्यंत वाढवण्यात आली याबद्दल कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी ट्विट करून केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांचे आभार मानले आहेत.

# कर्मचाऱ्यांच्या कामबंदमुळे महसूल यंत्रणा ठप्प गजानन : उत्तमराव मोहोड

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयातील प्रकार

**अमरावती :** प्रलंबित विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेद्वारा सोमवारपासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करण्यात आले. त्यामुळे जिल्हाभरातील महसूल यंत्रणा ठप्प झाली व कामकाज प्रभावित झाल्याचे दिसून आले. जिल्हाधिकारी कार्यालयात संघटनेचे जिल्हाध्यक्ष ब्रिजेश वस्तानी यांच्या नेतृत्वात सर्व कर्मचाऱ्यांनी प्रांगणात ठिय्या दिला, तर विभागीय आयुक्त कार्यालयात राज्य समन्वयक राजू धांडे, संघटन चंदू प्रधान, कार्याध्यक्ष लक्ष्मण नरमवार यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यालयाचे प्रवेशद्वारा निदर्शने केलीत, याशिवाय जिल्ह्यातील सर्व तहसील व एसडीओ कार्यालयांतील कर्मचाऱ्यांनी बेमुदत कामबंद पुकारल्याने महसूल यंत्रणेचे कामकाज पहिल्याच दिवशी ढेपाळल्याचे दिसून आले.




महसूल विभागाचा सुधारित आकृतीबंध दांगट समिती अहवालातील शिफारशीनुसार कोणत्याही संवर्गातील कर्मचाऱ्यांची कपात न करता लागू करण्यात यावा. अव्वल कारकून, मंडळ अधिकारी संवर्गातून नायब तहसीलदार संवर्गात तत्काळ पदोनती देऊन आदेश निर्गमित करण्यात यावे. महसूल विभागाचा आकृतीबंध तत्काळ मंजूर करून पुरवठा विभागातील पदभरतीमुळे रिक्त होणारे महसूल कर्मचाऱ्यांना महसूल विभागात सामावून घेण्यात यावे. वेतनेदेयके उणे प्राधिकारपत्रावर काढण्याबाबत तत्काळ शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा. महसूल सहायकाचा ग्रेडपे १९०० रुपयांवरून २४०० रुपये करण्यात यावा. महसूल सहायक व तलाठी यांना सेवांतर्गत एकसमान परीक्षा पद्धती लागू करण्यात याव्यात, यासह अन्य मागण्या आंदोलनात करण्यात आल्या आहेत.

# पुणे शहरासह जिल्ह्यात संततधार पाऊस; धरण साखळीतील पाणीसाठ्यात वाढ

**पुणे :** पुणे शहरासह जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून मान्सूनच्या सरी कोसळत आहेत. शनिवारी आणि रविवारी देखील मोठ्या प्रमाणात दिवसभर पावसाच्या सरी बरसल्या आहेत. घाटमाथ्यावर ही चांगला पाऊस सुरू असल्याने पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणसाठ्याची पाणी पातळी वाढली आहे. लोणावळ्यात २४ तासात सर्वाधिक म्हणजे, तब्बल २४१.५ मिमी पाऊस झाला आहे. तर, ताम्ही घाट परिसरात यंदाचा उच्चांकी ३१५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. राज्यभरात मान्सून सक्रिय झाला आहे.

पुणे शहरासह घाटमाथ्यावर मुसळधार पावसाची शक्यता वर्तविली आहे. पावसाचा जोर वाढला आहे. हवामान विभागाने १३ ते १६ जुलैदरम्यान घाट माथ्यावर अतिजोरदार ते मुसळधार पाऊस पडण्याची



शक्यता वर्तवली आहे. शनिवारप्रमाणे रविवारी देखील शहरसह जिल्ह्यात दिवसभर संतताधार पाऊस सुरु होता. हलक्या सरींसह जोरदार पाऊस कोसळला. बंगालच्या उपसागरात आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यालगत ५.८ किलोमीटर उंचीवर चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. त्यामुळे पुढील तीन-चार दिवस पावसाचे असणार आहेत. पुढील आठवड्यात संततधार पाऊस कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या खकवासला धरण साखळीमध्ये २८.६२ टक्के म्हणजे ८.३४ टीएमसपी पाणीसाठी जमा झाला आहे.

**दिवस भरात झाडपडीच्या १९ घटना**

पुणे शहरात सुसाट वाऱ्यांसह मुसळधार पाऊस झाला आहे. शहरात दिवसभरात सकाळी सात ते सायंकाळी ६ पर्यंत १९ ठिकाणी झाडपडीच्या घटना घडल्या आहेत. यात सुदैवाने जिवीतहानी झालेली नाही. कोथरूड, कोंढवा, कोरेगांव पार्क, हडपसर यासह विविध भागात झाडपडी झाली आहे. दरम्यान, अग्निशमन दलाने माहिती मिळताच झाडे बाजूला करून वाहतूक सुरळीत सुरू केली आहे.

कात्रज भागातील तलावात महिला बुडाली

कात्रज भागातील गुजरवाडी परिसरात असलेल्या तलावात एक महिला बुडाल्याची घटना रविवारी सायंकाळी उघडकीस आली आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत महिलेचा शोध सुरू केला. परंतु, बुडालेल्या महिला मिळाली नसून, तिचे नावही समजू शकले नाही.

**तुलनेने समाधानकारक पाऊस**

**गेल्या काही दिवसांपासून शहरासह धरणक्षेत्रात पाऊस सुरू आहे. त्यामुळे पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांपैकी खडकवासला, टेमघर, वरसागाव व पानशेत धरणांमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत आजपर्यंत पाणी पातळी वाढली आहे.**

# पंढरपूर वारीसाठी सातारा विभागातून २१५ जादा बसेस


**२१ जुलैपर्यंत सेवा राहणार सुरू**

**सातारा प्रतिनिधी ।** पंढरपूर येथील आषाढी एकादशी सोहळ्यासाठी वारकरी व भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा सातारा विभाग सज्ज झाला आहे. दि. २१ जुलैअखेर सातारा विभागातील सर्व ११ आगारांतून २१५ जादा बसेस सोडण्यात येणार आहेत.

पंढरपूरचा यात्रा कालावधी दि. १३ ते २१ जुलै असा आहे. बुधवार, दि. १७ जुलै रोजी आषाढी एकादशी हा यात्रेचा मुख्य दिवस आहे. त्यामुळे आषाढी एकादशी सोहळ्यासाठी सातारा जिह्यातून मोठय़ा प्रमाणात वारकरी भाविक पंढरपूर येथे जात असतात. त्यामुळे सातारा विभागातून सातारा २५, कराड २०, कोरेगाव २५, फलटण ३०, वाई १५, पाटण १५, दहिवडी २०, महाबळेश्वर ८, मेढा २०, पारगाव खंडाळा १२, वडूज २० अशा मिळून २१५ जादा बसेस सोडण्यात येणार आहेत. मार्ग तपासणी पथकामार्फत बसेसची फलटण, बरड, मानेवाडी, मायणी, म्हसवड येथील तपासणी करण्यात येणार आहे.

# इचलकरंजी मतदारसंघ पाकव्याप्त काश्मीर मानला पाहिजे

## हर्षवर्धन पाटलांचं वादग्रस्त वक्तव्य



शिवसेनेच्या शिंदे गटातील नेते आणि माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी इचलकरंजीची तुलना थेट पाकव्याप्त काश्मीरशी केली आहे. सांगली येथील एका कार्यक्रमात पाटील यांनी केलेल्या वक्तव्यामुळे मोठा वाद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शिवसेनेच्या शिंदे गटाचे नेते धैर्यशील माने यांनी सलग दुसऱ्यांदा हातकणंगले लोकसभा मतदारसंघात विजय मिळवला आहे. या विजयाबाबत माने यांचं अभिनंदन करताना हर्षवर्धन पाटील म्हणाले, इचलकरंजी लोकसभा मतदारसंघ हा तसा पाहिला तर पाकव्याप्त काश्मीर मानायला पाहिजे. पाटील यांच्या या वक्तव्यावर आता विरोधकांच्या तिखट प्रतिक्रिया येऊ शकतात.

१९७५ ते २००९ पर्यंत हातकणंगले हा मतदारसंघ इचलकरंजी नावाने ओळखला जात होता. मात्र २००९ साली झालेल्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर या मतदारसंघाचं नाव हातकणंगले असं करण्यात आलं. या हातकणंगले मतदारसंघात यंदा चुरशीची लढत पाहायला मिळाली. मात्र शिवसेनेच्या शिंदे गटाचे उमेदवार धैर्यशील माने यांनी शिवसेनेच्या ठाकरे गटाचे उमेदवार सत्यजीत पाटील यांचा अवघ्या १३ हजार मतांनी पराभव केला.

काय म्हणाले हर्षवर्धन पाटील?

सांगलीच्या सभेत हर्षवर्धन पाटील म्हणाले, मी सर्वात आधी खासदार धैर्यशील माने यांचं अभिनंदन करतो. सर्वांना विनंती करतो की तुम्ही देखील टाळ्या वाजवून माने यांचं अभिनंदन करायला पाहिजे. कारण इचलकरंजी लोकसभा मतदारसंघ हा तसा पाहिला तर पाकव्याप्त काश्मीर मानायला पाहिजे. कारण आजूबाजूला सगळी मोठी वादळं होती. आजूबाजूला सगळ्या शक्ती विरोधात उभ्या ठाकल्या होत्या. काही शक्ती अदृश्य होत्या, तर काही दृश्य स्वरूपाच्या होत्या. या सर्व प्रतिकूल परिस्थितीवर मात करून त्यांनी येथे विजय मिळवला आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत धैर्यशील माने यांनी या वावटाळात (वादळात) दिवा लावला आहे. त्यामुळे मी धैर्यशील माने यांचं मनापासून अभिनंदन करतो.

पाटील म्हणाले, बरं झालं माने यांनी मला सांगितलं आणि मी विमानाने नाही तर कारने येथे आलो. त्यांनी मला सांगितलं, पुढच्या वेळी इचलकरंजीला येताना ट्रेनने या. त्यानंतर तुम्ही मोटरसायकलवरून या. गरज पडल्यास सायकलवरून या. काल राज्याचे मुख्यमंत्री देखील पंढरपूरला बुलेटवर बसून गेले. राज्याचा नेता असा असायला हवा. राज्याचा नेत जनसामान्यांमध्ये मिसळायला हवा. हीच शिकवण आपल्याला या मातीने दिली आहे. मी किंवा धैर्यशील माने देखील ती शिकवण पाळत आलो आहोत.

काही दिवसांपूर्वी धैर्यशील माने यांनी देखील म्हटलं होतं की हातकणंगले मतदारसंघात मी वादळात दिवा लावला आहे. माने म्हणाले होते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली आपण ही लोकसभा निवडणूक लढलो. संपूर्ण ताकदीनिशी आपण या निवडणुकीत यशस्वी झालो. पश्चिम महाराष्ट्रात अनेक बुरुज ढासळले (मातब्बर नेते पराभूत झाले) आणि मी वादळात दिवा लावला. मतमोजणीच्या दिवशी माझ्या मतदारसंघात दुपारपासूनच विरोधक गुलाल लावून फिरू लागले होते. मशाल पेटली, मशाल पेटली (शिवसेनेच्या ठाकरे गटाचं निवडणूक चिन्ह) असं म्हणत जल्लोष करत होते. परंतु, संध्याकाळी पाच वाजता पाऊस पडला आणि ती मशाल

# शरद पवारांवर निशाणा साधल्यानंतर अजित गटाचे छगन भुजबळ त्यांना भेटायला आले

एक दिवसापूर्वीच छगन भुजबळ यांनी शरद पवारांवर जोरदार हल्लाबोल केला होता, अशा वेळी ही बैठक झाली. महाराष्ट्रात मराठा आरक्षणावरून ज्या प्रकारे लोकांना भडकावले जात आहे त्यामागे शरद पवार असल्याचा आरोप त्यांनी केला होता.

महाराष्ट्राच्या राजकारणात सोमवारी वेगळेच समीकरण पाहायला मिळाले. मराठा आरक्षणाच्या बैठकीला हजर न राहिल्याने एक दिवसापूर्वी शरद पवार यांच्यावर हल्लाबोल करणारे नेते आज त्यांना भेटताना दिसले. होय, आम्ही बोलतोय राज्यमंत्री छगन भुजबळ यांच्याबद्दल. वास्तविक, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटातील काही नेते नाराज असून ते शरद पवार यांच्यासोबत जाऊ शकतात, अशा बातम्या यापूर्वीच आल्या होत्या. दरम्यान, सोमवारी अचानक अजित गटाचे दिग्गज नेते भुजबळ शरद पवारांच्या भेटीसाठी दाखल झाले.

**एक दिवसापूर्वी हल्ला केला**

एक दिवसापूर्वीच छगन भुजबळ यांनी शरद पवारांवर जोरदार हल्लाबोल केला होता,



अशा वेळी ही बैठक झाली. महाराष्ट्रात मराठा आरक्षणावरून ज्या प्रकारे लोकांना भडकावले जात आहे, त्यामागे शरद पवार असल्याचा आरोप त्यांनी केला होता आणि आज ते त्यांची भेट घेण्यासाठी त्यांच्या घरी 'सिल्व्हर ओक' पोहोचले.

**बैठकीचे कारण स्पष्ट झालेले नाही**

त्यांनी अद्याप बैठकीचे कारण दिलेले नाही. वृत्तांवर विश्वास ठेवला तर शरद पवार आणि छगन भुजबळ यांच्यातील ही भेट मराठा विरुद्ध ओबीसी यांच्यातील लढतीमुळे झाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ९ जुलै रोजी ओबीसींच्या मुद्द्यावर सर्वपक्षीय बैठक बोलावली होती, मात्र त्यात एकही विरोधी पक्षनेता सहभागी झाला नाही. यापूर्वी रविवारी छगन भुजबळ यांनी बारामतीत शरद पवार यांचे नाव न घेता दोन समाजात तेढ निर्माण केल्याचा आरोप केला होता. बारामतीतून फोन आल्यानंतरही मविआचे नेते आरक्षणाच्या बैठकीला आले नाहीत. महाविकास आघाडीचे (एमव्हीए) नेते बारामतीतून फोन आल्याने आरक्षणासंदर्भात बैठकीला आले नसल्याचा दावा भुजबळ यांनी केला होता. बारामती लोकसभा मतदारसंघ हा शरद पवारांचा बालेकिल्ला मानला जातो.

**राष्ट्रवादीत फूट?**

पक्षात आपले म्हणणे ऐकून घेतले जात नसल्याचे भुजबळांना वाटत असल्याचे राष्ट्रवादीच्या सूत्रांचे म्हणणे आहे. ते अजित पवार यांच्या संघटनेत आहेत पण राजकीयदृष्ट्या ते पक्षात एकाकी पडले आहेत.

भुजबळांच्या शरद पवारांच्या भेटीबाबत विचारले असता, राज्यमंत्री आणि भाजप नेते सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, राजकीय नेते वैचारिक मतभेद न बाळगता आपापसात चर्चा करतात, अशी महाराष्ट्रात परंपरा आहे. दोन नेत्यांमधील प्रत्येक संभाषणाची छाननी करून काहीही वेळेपूर्वी बोलणे चुकीचे आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते जितेंद्र आव्हाड म्हणाले, 'सार्वजनिक क्षेत्रातही ते विरोधी विचारांच्या लोकांना वेळ देतात हे शरद पवारांचे औदार्य दाखवते. ते म्हणाले, 'भुजबळांच्या पक्षातील अंतर्गत कारभाराची मला चिंता नाही. पवारांना भेटायचे असेल तर भेटू द्या.

# शेतात तुटलेल्या वीज तारेच्या धक्क्याने शेतकरी महिला जागीच ठार

पार्वती यशवंत महांगरे (वय ६०, रा. गुठाळवाडी ता. खंडाळा) असे मृत शेतकरी महिलेचे नाव आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, पार्वती व त्यांचे पती हे शनिवारी सकाळी शेतात गेले होते. सायंकाळी काम उरकल्याने दोघेही घरी परत येत होते. ते एका विहिरीजवळ आले असता पार्वती यांचा पाय तुटलेल्या विजेच्या तारेवर पडला. यामुळे त्यांना जोरदार विजेचा धक्का बसला. त्यांना वाचवण्यासाठी पती यशवंत महांगरे यांनी प्रयत्न केला. यामध्ये त्यांनाही विजेचा धक्का लागल्याने ते बाजूला फेकले गेले.

यावेळी दोघांनीही आरडाओरडा केल्याने ग्रामस्थांनी धाव घेत झाडांच्या फांदीच्या साहाय्याने तुटलेली विजेची तार बाजूला केली. ग्रामस्थांनी पार्वती व यशवंत यांना शिरवळ प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच पार्वती यांचा मृत्यू झाला. मृतदेहाचे विच्छेदन करून नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

# कुरुंदवाड येथील सातव्या-आठव्या दिवशीच्या पीर-पंजाच्या भेटी उत्साही वातावरणात संपन्न

### मंगळवारी खत्तलरात्र,पानसुपारी,नैवेध-पटका अर्पण आणि खाई फोडणीचा कार्यक्रम

**कुरुंदवाड :** येथील पीर पंजांच्या सातवी-आठवी दिवशी पहिल्या पीरांच्या भेटी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाल्या.बागवान पीर मोमीन पीर,झारी पीर,बारगिर पीर सह १९ पीरांच्या भेटी उत्साही भक्तिमय वातावरणात रविवार आणि सोमवारी रात्री उशिरा पर्यंत संपन्न झाल्या.दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सपोनि रविराज फडणीस,उपनिरीक्षक सागर पवार यांनी चोख पोलिस बंदोबस्त लावला होता.

दरम्यान पाऊस असल्याने पीर भेटीसाठी निघणार की नाही?अशी संभ्रमावस्था निर्माण झाली होती.भर पावसात ही पीर कमिटी प्रमुखांनी पिराची कपडे भिजू नयेत म्हून प्लास्टिक कॅरी-बोध घालून पीर भेटीसाठी दर्गाहेतुन बाहेर काढले.अशा पावसात ही भाविकांनी भेटी पाहण्यासाठी गर्दी केली होती.

रविवारी रात्री मोहरमच्या सातव्या दिवशीच्या पहिल्या भेटीला सुरुवात झाली.



**सपोनि.फडणीस यांनी केली भाविकांची सोय**

**स.पो.नी फडणीस यांनी कुरुंदवाड शहरातील भेटीच्या मार्गावर असणारे सर्व टी स्टॉल,आईस्क्रीम-भेळ गाड्यामुळे गर्दी निर्माण होऊन भेटीच्या पिरांना व भाविकांना त्रास होऊ नये म्हून त्यांना अन्यत्र हलवत मार्ग खुला केला होता.त्यामुळे भरपावसात भाविकांना रस्त्याच्या कडेला थांबण्याची सोय झाली होती.स.पो.नि फडणीस,उपनिरीक्षक सागर पवार यांच्या या कामगिरी बद्दल भविकातून समाधान व्यक्त होत आहे.**

# खेड तालुक्याच्या वांद्रे गावात अवतरला सुरक्षित प्रती भुशी डॅम

**राजगुरूनगर (वा.) :** खेड तालुक्यात पर्यटनाला चालना मिळावी आणि स्थानिकांना रोजगार उपलब्ध व्हावा या प्रमुख उद्देशाने जिल्हा नियोजन समितीचे सदस्य शरद बुट्टे पाटील यांनी आपल्या संकल्पनेतून लोणावळा येथील भुशी डॅमच्या धर्तीवर तालुक्याच्या पश्चिमेकडील सह्याद्रीच्या कुशीतील वांद्रे गावच्या पढरवाडी येथे एक सुरक्षित आणि सुंदर पर्यटनस्थळ विकसित केले आहे. भुशी डॅम सारखे वांद्रे गावातील हे पर्यटनस्थळ पाहण्यासाठी सध्या पर्यटकांची प्रचंड गर्दी होऊ लागली आहे.

'आपलं वांद्रे सुंदर वांद्रे' या टॅगलाईन खाली जिल्हा नियोजन समितीचे सदस्य शरद बुट्टे पाटील यांच्या संकल्पनेतून वांद्रे हे गाव पर्यटनस्थळ म्हणून उदयास आले. निसर्गाचे वरदान लाभलेल्या वांद्रे पढरवाडी येथे जिल्हा परिषद मालकीच्या पाझर तलावाच्या सांडव्याचा उपयोग त्यासाठी करण्यात आला आहे. लोणावळा येथील भुशी डॅम प्रमाणे पाझर तलावाचे या ठिकाणी सांडव्यामध्ये पायऱ्यांचे बांधकाम करण्यात आले असून बाजूला पर्यटकांना उभे राहण्यासाठी फूटपाथ देखील केला आहे. पाझर तलावातून सांडव्यात येणारे पाणी आणि सांडव्यातून खोल खोल ओढ्यात उतरणारे पाणी या दोन्ही ठिकाणी लोखंडी काढडा लावून हा संपूर्ण भाग पर्यटकांसाठी पूर्णतः सुरक्षित केला आहे.

या परिसरातील जंगल आणि डोंगरदऱ्यातून येणारे पाणी या पाझर तलावात येत असून पाझर तलाव ओव्हर फ्लो झाल्याने या सांडव्यातून सम पातळीत पडणारे पाणी पर्यटकांना आकर्षित करत आहे. ५०० हून अधिक पर्यटक एकावेळी पाण्यात खेळण्याचा आनंद घेऊ शकतील एवढी विस्तीर्ण जागा येथे उपलब्ध आहे. जंगल व डोंगरदऱ्यातून येणारे हे पाणी निश्चितच आरोग्याच्या दृष्टीने हितकारक आहे. कारण या परिसरात मानववस्ती नसल्याने ते पूर्णतः नैसर्गिक आहे. कोकण भागाला लागून असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पाऊस पडतो त्यामुळे तीन महिने या सांडव्यातून पाणी वाहत असते. सहकुटुंब अगदी लहान मुलांना देखील या पाण्यात खेळण्याचा आनंद घेता येईल अशी ही जागा सुरक्षित



**वांद्रे ग्रामपंचायतीने नियोजन केल्यास गावचे उत्पन्न वाढून तरुणांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील या हेतूने हे पर्यटनस्थळ विकसित केले.वांद्रे गावाला तात्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या माध्यमातून 'क' वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा मिळविला. त्यामुळे नवनवीन उपाययोजना या ठिकाणी करण्याचा मार्ग मोकळा झाला. भविष्यात या परिसरात सुलभ शौचालय, चेंजिंग रूम, पार्किंग, भामेश्वर मंदिर घाट परिसर सुधारणा, जंगल सफारीसाठी मार्गदर्शक नामफलक आधी सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. दिवाळीनंतर सांडव्यातील पाणी बंद झाल्यानंतर या ठिकाणी टेंट लावून पर्यटकांना जंगल आणि लेक परिसरात राहण्याचा आनंद घेता येईल.**

**- शरद बुट्टे पाटील - सदस्य, पुणे जिल्हा नियोजन समिती.**

# ओगलेवाडीच्या सराईत आरोपीला ठोकल्या बेड्या

**सातारा प्रतिनिधी ।** एका प्रकरणात फसवणूक करून तो गेल्या पाच वर्षापासून पोलिसांना गुंगारा देऊन पेहराव करून बंगळूरमध्ये राहत होता. इकडे सातारा पोलिसांकडून त्याचा शोध घेतला जात असताना त्यांना 'त्याच्या'बाबत माहिती मिळाली. माहिती मिळताच सातारा पोलिसांचे पथक साताऱ्यातून थेट बंगळुरमध्ये दाखल झाले आणि सिनेस्टाइलने बंगळुरात ट्रॅफिक जाम करून त्यांनी सराईत अशा गुन्हेगारास अटक केली. फसवणूक प्रकरणी सातारा पोलिसांनी एका महिलेसह चौघांना अटक केली.

विनायक शंकर रामुगडे (वय ४४, रा. ओगलेवाडी, ता.कराड), कलावती ऊर्फ प्रिया रामचंद्र चव्हाण (४३, मूळ रा. कोरेगाव, सध्या रा. शाहूनगर, गोडोली, सातारा) तसेच या दोघांना मदत करणाऱ्या अनुजा मंगेश जाधव (२६, रा. चंदननगर, कोडोली), कुणाला अमर भांडे (२४, रा. शाहूनगर, गोडोली, सातारा), अशी पोलिसांनी अटक केलेल्यांची नावे आहेत. त्याच्या शोधासाठी पोलिसांनी रात्रीचा दिवस केला आणि अखेर तो बंगळूरमध्ये असल्याची माहिती डीबी पथकाला मिळाली.

# झाडाणीतील ६२० एकर जमीन खरेदी प्रकरणी राष्ट्रीय हरित न्यायालयाकडून स्युमोटो याचिका दाखल

**सातारा ।** सध्या राज्यात गाजत असलेल्या महाबळेश्वरमधील झाडाणी येथील तब्बल ६२० एकर जमीन व्यवहार प्रकरणी नुकतीच साताऱ्यात अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे यांच्यासमोर पुन्हा सुनावणी पार पडली. यावेळी सुनावणीस गुजरातचे जीएसटी आयुक्त चंद्रकांत वळवी यांनी स्वतः उपस्थिती लावली. दरम्यान, अप्पर जिल्हाधिकारी गलांडे यांनी दि. २९ जुलैला सर्व कागदपत्रांसह हजर राहण्यास सांगितले असून याच दिवशी या प्रकरणाची अंतीम सुनावणी होणार आहे. मात्र, अंतिम सुनावणी पूर्वीच राष्ट्रीय हरित न्यायालयाने या प्रकरणाची दखल घेत सुमोटो याचिका दाखल करत जिल्हाधिकाऱ्यांसह ५ जणांना नोटीसा काढल्या आहेत.

अहमदाबाद येथे कार्यरत असलेले गुजरातचे जीएसटी कमिशनर चंद्रकांत वळवी यांनी सातारा जिल्हयातील कांदाटी खोऱ्यातील झाडाणी येथील ६२० एकर जमीन खरेदी केली आहे. सामाजिक कार्यकर्ते सुशांत मोरे यांनी जमिनीच्या या अधिग्रहणामुळे विविध पर्यावरणीय धोके निदर्शनास आणून तक्रार केली होती.

स्थानिक हवा आणि पाण्याच्या गुणवत्तेवरही गंभीर परिणाम होत असून अनधिकृत बांधकाम, झाडांची कत्तल, आणि बेकायदेशीर रस्ते आणि वीज पुरवठा विकासामुळे पर्यावरणीय नुकसान झाल्याचा आरोप करत सुशांत मोरे यांनी या विरोधात याचिका दाखल केली होती.

महाबळेश्वर येथील झाडानी प्रकरणी यापुर्वी चार तारखा झाल्या आहेत. दरम्यान, नुकत्याच झालेल्या सुनावणीत चंद्रकांत वळवी यांनी त्यांच्या राज्यातील अर्थसंकल्प असल्याचे कारण देत उर्वरित कागदपत्रे सादर करण्यासाठी मुदत मागितली आहे.

# सातारा जिल्ह्यात ४३ हजार ५०० वृक्षांची लागवड



**सातारा प्रतिनिधी ।** सातारा जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये कृषी दिन ते जागतिक निसर्ग संवर्धन दिन या कालावधीत वृक्ष लागवड मोहीम राबवली जात आहे. आतापर्यंत विविध ग्रामपंचायतींनी ४३ हजार ५०१ वृक्षांची लागवड केली आहे. यामध्ये १०५ ग्रामपंचायतींचे किमान १०० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण झाले आहे.

सातारा जिल्ह्यातील १ हजार ४९६ ग्रामपंचायतींमध्ये वृक्ष लागवड मोहीम प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. त्यासाठी जिल्हा स्तरावरून सर्व पंचायत समितीच्या गटविकास अधिकार्यांना सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार ग्रामपंचायतींनी परिपूर्ण नियोजन केले. काही ग्रामपंचायतीमध्ये वृक्ष लागवड मोहिमेस चांगला प्रतिसाद मिळत आहे.

# अधिकाऱ्यांनी कायदा व व्यवहाराशी सांगड घालून लाभार्थ्यांची कामे करावीत : आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर

**शिरोळ :** अंध, अपंग, निराधार व ज्येष्ठ अशा २० हजार २१६ लाभार्थ्यांना विविध लाभाच्या माध्यमातून राज्य शासनाच्या वतीने महिन्याला ४.५० कोटी रुपये देण्यात येते. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमुळे आपल्या तालुक्यातील लाभार्थ्यांना सुमारे १२ कोटी रुपयांचा लाभ मिळेल. त्यामुळे शासकीय लाभामध्ये आपला शिरोळ तालुका एक नंबर ठेवण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांनी कायदा व व्यवहाराची सांगड घालून प्रत्येक गरीब गरजू जनतेला शासनाच्या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी काम करावे, असे आवाहन माजी आरोग्य राज्यमंत्री डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी केले.

तहसीलदार कार्यालय शिरोळ, महाराजस्व अभियानांतर्गत संजय गांधी योजनेच्या लाभार्थ्यांचे मंजुरी पत्राच्या वाटप प्रसंगी ते बोलत होते. प्रारंभी संजय गांधी योजनेचे २४३ तर श्रावणबाळ व इंदिरा गांधी योजनेचे ५६५ अशा एकुण ९०८ लाभार्थ्यांना मंजुरी पत्रांचे वाटप आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



स्वागत तलाठी सदाशिव निकम तर प्रास्तविक नायब तहसीलदार योगेश जमदाडे यांनी केले.

यावेळी १९ तलाठी कार्यालय व एक मंडल अधिकारी कार्यालयासाठी ३ कोटीचा निधी मंजूर केल्याबद्दल आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी पुढे बोलताना आमदार यड्रावकर म्हणाले, शासनाच्या प्रत्येक योजनेचा लाभ तळागाळातील गोरगरिबांना मिळावा, यासाठी संबंधित शासकीय अधिकाऱ्यांनी ज्या त्या गावात कॅम्प घेऊन लाभार्थी पात्र करून घ्यावेत. जेणेकरून सर्वांना शासनाच्या योजनेचा लाभ मिळावा. सध्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून शिरोळ तालुक्यातील जवळपास ६१ हजार महिलांना त्याचा लाभ मिळणार आहे. पहिल्या टप्प्यामध्ये २५ हजारहून अधिक लाभार्थी पात्र झाले पाहिजेत, त्या पद्धतीने प्रशासनाने काम करावे. त्याचबरोबर राज्य शासन गृहिणीला तीन गॅस सिलेंडर मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे.

त्याचाही फायदा येणाऱ्या काळात लाभार्थ्यांना होणार आहे. महिलांच्या उन्नती बरोबर सरकारने वारकरी संप्रदायाचे स्वतंत्र महामंडळ करीत प्रत्येक दिंडीला २० हजार रुपये देण्याचा निर्णय, मुलींना मोफत शिक्षण यासह विविध योजना अल्पसंकल्पाच्या माध्यमातून साकारण्यात आल्या आहेत.

महापुरा संदर्भात बोलताना ते म्हणाले, गेल्या दोन-तीन वर्षांमध्ये कर्नाटक आणि महाराष्ट्र सरकारने समन्वय साधून महापुराचा धोका टाळला आहे. सध्या जागतिक बँकेकडून प्रस्ताव सादर करून ३ हजार २०० कोटी रुपयांचा प्रस्ताव महापुराचे पाणी दुष्काळी भागाकडे वळविण्यासाठी तयार करण्यात आला आहे. येणाऱ्या वर्षभरात प्रस्ताव मंजूर होऊन त्याला दृष्टीने काम करण्यात येणार असून आपल्या शिरोळ तालुक्याला कायमस्वरूपी महापुराचा धोका टळणार असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

यावेळी बोलताना संजय गांधी योजना समितीचे अध्यक्ष प्रकाश पाटील टाकवडेकर म्हणाले, आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर यांच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षापासून अपंग, वृद्ध आणि निराधारांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याचे माझ्या हातून घडत आहे. यापुढेही शिरोळ तालुक्यातील गोरगरीब जनता शासनाच्या कोणत्याही योजनेपासून वंचित राहणार नाही, याची दखल घेऊन त्या दृष्टीने काम करण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी तहसिलदार अनिलकुमार हेळकर, संजय गांधी निराधार व स्वावलंबना योजना समितीचे सदस्य केशव राऊत, संजय नांदणे, संजय सुतार, अजिंक्य पाटील यांच्यासह सर्व शासकीय अधिकारी, तलाठी मंडळ अधिकारी आणि लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार संजय गांधी निराधार योजनेचे सदस्य संजय शिंदे यांनी मानले.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# ढोलबारे मार्केटमध्ये भाजीपाला खरेदीला पहिल्याच दिवशी प्रचंड प्रतिसाद

**(बागलाण)** : तालुक्यातील ढोलबारे गावात दि. २ मे २०२४ पासून खाजगी कसमादे शेतकरी कृषी उत्पन्न बाजाराला सुरुवात झाली आहे. तेव्हापासून या मार्केटमध्ये कांदा लिलाव नियमितपणे सुरु आहे.

शेतकऱ्यांनी दिलेला प्रतिसाद आणि वेळोवेळी केलेल्या सुचनांचा विचार करुन ढोलबारे मार्केट आस्थापनेने भाजीपाला खरेदीही सुरु करण्याचे ठरविले होते. त्यानुसार दि. १५ जुलै, सोमवार रोजी सायंकाळी ०४:०० वाजता ढोलबारे मार्केट मध्ये भाजीपाला खरेदीचा शुभारंभ करण्यात आला.

पहिल्याच दिवशी परिसरातील भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्याप्रमाणात भाजीपाला मार्केटमध्ये विक्रीस आणून सकारात्मक सुरुवात केली. व्यापारीवर्गही मोठ्याप्रमाणात उपस्थित झाल्यामुळे आलेल्या मालास प्रतवारीनुसार शेतकऱ्यांना समाधानकारक भावही देण्यात आला.



भाजीपाला खरेदीच्या पहिल्याच दिवशी मिरची, कोबी, फ्लॉवर, टोमॅटो, जांभळे वांगे, काकडी, गवार, ढोबळी मिरची, मेथी यांसाख्या विविध वानांच्या भाजीपाल्याची आवक मोठ्याप्रमाणात दिसून आली.

या मार्केमध्ये भाजीपाला लिलाव रविवार ते शुक्रवार दुपारी ०२ ते ०५ या कालावधित नियमितपणे पार पडणार असून, शेतकऱ्यांच्या सोयीसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा मार्केटमध्ये उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. स्वतंत्र पार्कींग, शेतकऱ्यांसाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छता गृह, शेतकरी निवास, नामांकीत व्यापारीवर्ग, विक्री झालेल्या मालाची शेतकऱ्यास तात्काळ रकम सुपूर्द करणे यासारख्यां खास वैशिष्ट्यांसह खाजगी कसमादे शेतकरी कृषी उत्पन्न बाजार (ढोलबारे) सजलेले असल्यामुळे शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

भाजीपाला खरेदीचा पहिलाच दिवस असल्याने या मार्केट मध्ये भाजीपाल्याचे पहिलेच वाहन ज्या शेतकऱ्याने दाखल केले ते पिंगळवाडे येथिल दादाजी शिवाजी खैरणार यांचा मार्केटच्या वतिने शॉल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. खैरणार यांनी त्यांच्या शेतातील गवार मार्केटमध्ये आणली होती.

खाजगी कसमादे शेतकरी कृषी उत्पन्न बाजार ढोलबारे येथिल भाजीपाला खरेदीचा शुभारंभ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमापुजनाने व ओम गुरुदेवांच्या आरतीने करण्यात आला. या आस्थापनेची शेतकऱ्यांविषयीची भावना सभापती सुरेश (नाना) पवार यांनी त्यांच्या प्रास्ताविकपर मनोगतातून विषद केली, कुमारी तनिष्का खैरणार हीने शेतर्क़यांच्या सन्मानपर मनोगत व्यक्त केले, सचिव गणेश (भाऊ) पवार यांनी आभार मानले, उपसचिव प्रा. अमोल बच्छाव यांनी सुत्रसंचलन केले.

# डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर अवघ्या २० वर्षीय तरुणाकडून गोळीबार

## बाजारपेठ, खर्डेकर चौक, स्टॅन्ड परिसरात नगरपालिकेची मोहीम

**दिल्ली** : फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशनने शनिवारी पेनसिल्व्हेनियामध्ये निवडणूक प्रचारादरम्यान डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर गोळ्या झाडणाऱ्या व्यक्तीची ओळख पटवली आहे. हा अवघा २० वर्षीय तरुण असून थॉमस क्रुक्स असं त्याचं नाव असल्याचं **FBI** ने सांगितलं. या हल्ल्यामागचा त्याचा हेतू आता पोलीस शोधत आहेत.



दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर गोळीबार करताच क्षणी सीक्रेट सर्व्हिसच्या सदस्यांनी प्रतिहल्ला केला. या प्रतिहल्ल्यात थॉम मॅथ्यू क्रुक्सचा मृत्यू झाला आहे.

शनिवारी अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर झालेल्या हल्ल्यानंतर फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन (एफबीआय) एजंटने पत्रकार परिषदेत सांगितले की, संशयिताकडे ओळखपत्र नसल्यामुळे शूटरच्या ओळखीची पुष्टी करण्यासाठी अधिकारी डीएनए चाचणी करण्यात येईल. हल्लेखोराची कोणतीही ओळख नव्हती. त्यामुळे त्याची डीएनए चाचणी करण्यात येईल, असं त्यांनी म्हटलं होतं. त्यानंतर, त्याची ओळख पटवण्यात आली.

आम्ही आत्ता छायाचित्रे पाहत आहोत आणि आम्ही त्याचा डीएनए चालवण्याचा आणि बायोमेट्रिक पुष्टीकरण मिळविण्याचा प्रयत्न करत आहोत. न्यू यॉर्क पोस्टच्या वृत्तानुसार, बटलर फार्म शो मैदानावरील स्टेजपासून १०० मीटरपेक्षा जास्त अंतरावर असलेल्या एका मॅन्युफॅक्चरिंग प्लांटच्या छतावर क्रूक्स लपून बसला होता. या मैदानाच्या दक्षिणेस ५० किमीवर बेथेल पार्क हे गाव आहे. क्रुक्सकडून नंतर एआर शैलीतील रायफल जप्त करण्यात आली आहे. या हल्ल्यामागील हेतू अद्याप अस्पष्ट आहे.



# सडावाघापूरचा उलटा धबधबा पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी

**पोलिसांकडून ३६ हजाराचा दंड वसूल**

**पाटण** : सर्वत्र प्रसिद्ध असलेला पाटण तालुक्यातील सडावाघापूरचा उलटा धबधबा सध्या पावसामुळे ओसंडून वाहू लागला आहे. हा उलटा धबधबा पाहण्यासाठी राज्यभरातील विविध जिल्ह्यातून मोठ्या संख्येने पर्यटक सडावाघापूरला दाखल होऊ लागले आहेत. दरम्यान या पर्यटकांमध्ये हुल्लडबाजी करणाऱ्या तरुणाईचा मोठा सहभाग आहे.

दरम्यान, चाफळ परिसरात पर्यटनाला आलेल्या हुल्लडबाज युवकांवर मल्हारपेठ पोलिसांकडून पोलिसी खाक्या दाखवत रविवारी कारवाई करण्यात आली. मोटर वाहन कायद्याचा भंग करणाऱ्या सुमारे ५५ वाहनांवर चाफळ पोलीस दूरक्षेत्राच्या हद्दीत कारवाई करीत त्यांच्याकडून सुमारे ३६ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

सडावाघापूर पठारावर हॉर्न वाजवत गाड्या फिरवणे, गाडीतील टेप रेकॉर्डर लावून धिंगाणा घालणे या प्रकारची हुल्लडबाजी सडावाघापूरला मोठ्या प्रमाणात वाढली आहे. याचा पर्यटकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

याच पार्श्वभूमीवर पाटण पोलीस क्शन मोडवर आलेले आहेत. पोलिसांच्यावतीने हुल्लडबाजावर करडी नजर राहणार असून पाटण पोलिसांच्या वतीने सडावाघापूर परिसरात बंदोबस्त लावण्यात आला आहे.

# पुणे - बंगळुरु राष्ट्रीय महामार्गावरील संरक्षक कठड्याला धडकून रिक्षा उलटली, बोरीवच्या वृद्धाचा जागीच मृत्यू

**सातारा** : वसंत हरिभाऊ पोळ (वय ६५, रा. बोरीव पोस्ट रहिमतपूर, ता. कोरेगाव) असे अपघातात मृत्यू झालेल्या वृद्धाचे नाव आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, रिक्षा चालक नवनाथ पोळ हे वडील आजारी असल्याने कुटूंबियांसमवेत रिक्षा क्रं. (चक-४३-इउ-८३८५) मधून कोरेगाव बाजूकडे येत होते. दरम्यान, शिरवळ गावच्या हद्दीत नवनाथ यांचे रिक्षावरील नियंत्रण सुटून रिक्षा महामार्गावरील संरक्षक कठड्याला धडकून रिक्षा उलटली. अपघाताची माहिती मिळताच तत्काळ शिरवळ पोलीस स्टेशनचे कर्मचारी व शिरवळ रेस्क्यू टिमच्या सदस्यांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना खासगी रुग्णालयात दाखल केले.

मात्र, वसंत पोळ यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर जखमी सुनेवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. मृत वसंत पोळ यांचे प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. या घटनेची नोंद शिरवळ पोलीस स्टेशनला झाली आहे. याबाबत प्रीती पोळ यांनी फिर्याद दिली असून पोलीस उपनिरीक्षक नयना कामथे हे अधिक तपास करीत आहे.

# कामगारांना उद्धस्त करणाऱ्या 'उबाठा'चे हात मराठी माणसाच्या रक्ताने माखलेले : आशिष शेलार

**दिल्ली** : मोदी जिंकले असे म्हणणाऱ्या लोकांनी डोकी तपासून घ्यावीत, कारण कुबड्या काढल्या तर सरकार कोसळू शकते, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी पंतप्रधान मोदी यांच्या सरकारवर टीका केली होती. त्या टीकेला आज मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार अँड आशिष शेलार यांनी खास शैलीत प्रत्युत्तर दिले. आशिष शेलार यांनी ट्विटरवर एक पत्र पोस्ट केले आणि टीकेचाखरपूस समाचार घेतला. महाराष्ट्रात एखादा उद्योग व्यवसाय येणार किंवा नवीन विकास प्रकल्प होणार असे कळताच कट कमिशन आणि राजकीय स्वार्थासाठी हातात विरोधाचा झेंडा घेऊन जे उतारतात, उद्योगांना महाराष्ट्रातून पळवून लावतात, त्याच पक्षाचे नेतेसंजय राऊत महाराष्ट्रातून उद्योग गेले म्हणून हग्रलेख लिहितात? अशी खोचक टीका शेलारांनी केली. आता विषय काढलाच आहे तर मग, संजय राऊत तुम्हाला उत्तर द्यावी लागतील. मुंबई सोडून एलएनटी का गेली? कुणाची युनियन होती? महेंद्रा कंपनी मुंबई सोडून अन्य राज्यात का गेली? कुणाची युनियन होती? खंबाटा, एएफएल लॉजिस्टीक यांनी का शटर डाऊन केली? या सगळ्यांना युनियन बनवून कुणी त्रास दिला? ही मुंबईतील काही मोजकी उदाहरणे महाराष्ट्रातील गेल्या १५ वर्षातील उद्योग बंद झाले. त्याचा हिशेब काढला तर मग पुण्याच्या बजाज पासून सगळया कारखान्यांमध्ये उबाठाचीच युनियन होती ना? वेदांत फॉस्कॉन, बारसूची ग्रीन रिफायनरी, वाढवण बंदर या प्रकल्पांना विरोध कोण करतेय ? आणि पुन्हा महाराष्ट्रातून प्रकल्प गेले म्हणून ओडताय ? चोर तर चोर वरुन शिरजोर? असे खरमरीत सवाल शेलारांनी राऊतांना विचारले.मराठी कामगारांना उद्धस्तकरणाऱ्या उबाठाचे हात मराठी माणसाच्या रक्ताने ही माखलेले आहेत.



# भुजबळ-पवार भेट म्हणजे प्रगल्भ राजकीय संस्कृतीच दर्शन, जितेंद्र आव्हाड यांची प्रतिक्रिया

**ठाणे** : शरद पवार आणि छगन भुजबळ या दोन्ही नेत्यांमध्ये काय चर्चा झाली, हे कुणालाही सांगता येणार नाही आणि हे दोन्ही नेते कुणाला सांगणारही नाहीत. पण, या दोन्ही नेत्यांच्या भेटीतून राज्यातील प्रगल्भ राजकीय संस्कृतीचे दर्शन घडविले आहे, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. सत्ताधाऱ्यांना आरक्षण द्यायला जमत नसेल, त्यांनी राजीनामा दयावा, असे सांगत आम्ही आता लवकरच सत्तेत येऊ आणि त्यानंतर आरक्षण देऊ, असा दावाही त्यांनी केला.

आजच्या घडीला विरोधी पक्षांना विचारातच घेतले जात नाही. मराठवाडा विद्यापीठ नामांतरणाचा विषय पुढे आला होता, त्यावेळेस सर्व पक्षांच्या नेत्यांनी एकत्रित बसून निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी केली होती. आताही आरक्षणाचा इतका मोठा प्रश्न पुढे आल्यावर सर्व पक्षांना एकत्रित आणून तोडगा काढला पाहिजे होता. परंतु सरकारला आरक्षणाचे श्रेय घ्यायचे होते. त्याच्यातील एकजण ओबीसींबरोबर तर दुसरा मराठ्यांबरोबर बोलणी करत होता. पण, त्यांच्याशी काय बोलणी होते, हेच आम्हाला समजले नाहीतर आम्ही त्यावर काय बोलणार, असे आव्हाड म्हणाले. आरक्षणाच्या जाळ्यात आम्हाला अडकविण्याचा सरकारचा डाव होता. पण, तेच या जाळ्यात अडकले असून सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही, अशी सरकारची अवस्था झाल्याचा आरोप त्यांनी केला. शरद पवार यांच्या तब्येतीची विचारपुस करण्यासाठी भुजबळ हे गेले असतील तर त्यात चुकीचे काय आहे. उलट या भेटीतून भुजबळ यांनी त्यांच्या पूर्वश्रमीच्या नेत्याबद्दल काळजी दाखवल्याचे दिसून येते. शरद पवार म्हणजे जादू ची कांडी आहे. त्यामुळेच त्यांच्याशी चर्चा केली जात आहे, असेही आव्हाड म्हणाले.

# विधानसभेसाठी अजित पवारांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सर्वेक्षण करणार

## प्रफुल्ल पटेलांची माहिती

**दिल्ली** : लोकसभा निवडणुकीतील अपयश लक्षात घेऊन आगामी विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्यापूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसने राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघांचा सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल (झीरर्षीश्र झरींशश्र) यांनी सोमवारी पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा मारताना पक्षाच्या निर्णयाची माहिती दिली. तसेच आगामी विधानसभा निवडणूक ही महायुती म्हणूनच लढविणार असल्याचे पटेल यांनी स्पष्ट केले.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आमच्या पक्षाचे ५४ आमदार (MLA) निवडून आले होते. त्यातील पंढरपूरची जागा आम्ही पोटनिवडणुकीत गमावली. आता पक्ष म्हणून आमचे ५३ आमदार आहेत. त्याव्यतिरिक्त पाठिंबा दिलेल्या आमदारांची संख्या लक्षात आम्हाला विधानसभेला ६० पेक्षा जास्त जागा मिळायला हव्यात, अशी भूमिकाही पटेल यांनी स्पष्ट केली. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रफुल्ल पटेल यांनी आज पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा मारल्या. त्यावेळी त्यांनी आगामी विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्यापूर्वी सर्वेक्षण करणार असल्याचे सांगितले.




लोकसभा निवडणुकीत भाजपच्या सर्वेक्षणानुसार महायुतीचे जागावाटप झाले होते. आता विधानसभेचे जागावाटपही सर्वेक्षणाच्या आधारावर होणार का? या प्रश्नावर, आम्ही विधानसभेसाठी सर्वेक्षण करणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. परंतु, आम्ही केवळ आमच्याकडील मतदारसंघांचे सर्वेक्षण करणार नसून सर्व २८८ जागांचे सर्वेक्षण करणार आहोत. इतर मतदारसंघात आमच्याकडे एखादा सक्षम उमेदवार असेल तर त्याच्यावर अन्याय नको म्हणून सर्वेक्षण करणार असल्याचे पटेल यांनी सांगितले. या सर्वेक्षणानुसार जागावाटप करणार का? या प्रश्नावर, यावेळी महायुतीतील तीनही पक्ष आपापले सर्वेक्षण करतील. प्रत्येकाच्या सर्वेक्षण अहवालाच्या आधारे आम्ही जागा वाटपाच्या चर्चेला बसू, असे अजित पवारांनी सांगितले.

सध्या राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आहेत. त्यामुळे सध्या त्यांचीच गॅरंटी चालेल. आगामी विधानसभा निवडणूक कोणाच्या नेतृत्वाखाली लढवायची याचा निर्णय महायुतीत मोठा पक्ष असलेला भाजप घेईल, असे अजित पवारांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपची मते अजित पवार गटाला मिळाली नसल्याची चर्चा आहे. मात्र ही चर्चा अजित पवारांनी फेटाळून लावली. रायगडसह इतर मतदारसंघातही आम्हाला भाजपची मते मिळाल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर माढा आणि अहमदनगर लोकसभेची जागा आम्हाला मिळाली असती तर आज तिथे महायुतीचे खासदार असते, असेही ते म्हणाले. तसेच सातारा लोकसभा मतदारसंघाच्या जागेच्या बदल्यात अजित पवार गटाला मिळणाऱ्या राज्यसभेच्या जागी साताराचाच उमेदवार देणार का? याबाबत विचारले असता, त्यासंदर्भात पक्षाच्या संसदीय पक्षाच्या बैठकीत निर्णय घेतला जाईल, असे सुनील तटकरे यांनी यावेळी सांगितले. सुनेत्रा पवार यांना राज्यसभेची उमेदवारी देण्याबाबतचा निर्णय पक्षाच्या संसदीय मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला होता, याकडे अजित पवार यांनी लक्ष वेधले. नुकत्याच पार पडलेल्या विधानपरिषद निवडणुकीत आम्ही कोणालाही प्रलोभन दाखवले नाही. फक्त नमस्कार केला आणि मत मागितले, असेही अजित पवार म्हणाले.

# पाटण तालुक्यात NDRF ची टीम दाखल; दरडग्रस्त, पूरग्रस्त गावांना दिली भेट

**पाटण** : मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर सातारा जिल्हा प्रशासन अर्लट झाले असून जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी यापूर्वीच आपत्ती व्यवस्थापन विभागास सतर्क राहण्याच्या सूचना केलेल्या आहेत. गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत असून जिल्ह्यातील पाटण तालुक्यात एनडीआरएफ टीम रविवारी दाखल झाली आहे. दरम्यान, या टीमने अतिवृष्टी, भूस्खलनाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील दरडग्रस्त व पूरग्रस्त गावांना भेटी देऊन पाहणी केली आहे.

एनडीआरएफ टीममधील जवानांनी पाटण तालुक्यात दाखल होताच संबंधित गावातील ग्रामस्थांशी चर्चा करून, संभाव्य घटनांबाबत माहिती देऊन जनजागृती केली. संभाव्य धोका टाळून काळजी घेण्याबाबत ग्रामस्थांना सूचना केल्या. पाटण तालुका अतिपर्जन्यवृष्टीचा व तालुका म्हणून ओळखला जातो. तीन वर्षांपूर्वी याच पाटण तालुक्यातील मोरगिरी, कोयनानगरसह इतर विभागांमध्ये ढगफुटी झाली होती. आंबेघर, मिरगाव, ढोकावळे आदी गावांमध्ये भूस्खलनामुळे दरडी कोसळून घरे मातीत गाडली गेली होती. तब्बल २९ जणांना जीव गमवावा लागला होता. जनावरेही मातीत गाडली गेली होती.

यावेळी घटनास्थळी पोहोचताना रस्ता ही उपलब्ध न झाल्याने लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय यंत्रणेबरोबरच एनडीआरएफ टीमला मोठी कसरत करावी लागली होती. यावर्षीही या विभागात पावसाने मुसळधार सुरुवात केली आहे. याच पार्श्वभूमीवर संभाव्य धोका लक्षात घेऊन पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या प्रयत्नातून पाटण तालुक्यात घेज एनडीआरएफची टीम पाचारण करण्यात आली. त्यानुसार पाटण तालुक्यात ही टीम नुकतीच दाखल झाली आहे.

पाटण तालुक्यातील प्रशासन पहिल्यापासूनच अलर्ट मोडवर

एनडीआरएफ टीम दाखल झाल्यानंतर तहसीलदार अनंत गुरव यांनी संबंधित टीमसोबत बैठक घेऊन त्यांना धोकादायक, दरडग्रस्त व पूरग्रस्त गावाची माहिती दिली. दरम्यान, पाटण तालुक्यातील प्रशासन प

संबंधित दरडग्रस्त व पूरग्रस्त गावांच्या ठिकाणी जाण्यासाठी रस्तेही मोकळे करण्यात आले आहेत. त्यानंतर एनडीआरएफ टीमने सर्कल, मंडलाधिकरी, तलाठी यांच्याबरोबर पाटण तालुक्यातील आरल, म्हारखंड, जळव, जोतिबा, शिंद्रुकवाडी, आंबेघर, काहीर, कोयनानगर यासह इतर दरडग्रस्त व पूरग्रस्त गावांमध्ये प्रत्यक्ष भेटी दिल्या. संबंधित ठिकाणी जाऊन, पाहणी करून स्थानिक ग्रामस्थांशी चर्चा केली

# तासगाव पोलिसांनी ताब्यातील आरोपी सोडले

## आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांचा आरोप : आरोपी सोडणाऱ्या पोलिसांना निलंबित करा

**तासगाव** : तासगाव तालुक्यातील मांजर्डे येथील शीतल मोहिते या विवाहितेने सासरच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केली. याप्रकरणी सासरच्या मंडळींविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी पोलिसांनी चारही संशयित आरोपींना ताब्यात घेतले होते. मात्र केवळ पीडित महिलेच्या पतीला अटक केली. तर दिराला सोडून दिले. इतर दोन महिला आरोपींना रात्री अटक करता येत नाही, असे कारण सांगत त्यांनाही सोडून दिले. याप्रकरणी पोलिसांच्या ताब्यात असतानाही आरोपींना सोडल्याप्रकरणी आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांनी नाराजी व्यक्त केली आहे. आरोपींना सोडणाऱ्या पोलिसांना निलंबित करा, या मागणीसाठी पीडितेचे कुटुंब सोमवार दि. १५ पासून तासगाव पोलीस ठाण्यासमोर धरणे आंदोलन करणार आहेत. याबाबतचे निवेदन पोलीस उपअधीक्षक सचिन थोरबोले यांना दिले आहे.

दरम्यान, या प्रकरणातील आरोपींना पोलिसांनी दुपारी पोलीस ठाण्यात आणले. संदीप मोरे यांनी त्यांची चौकशी केली. दुपारपासून सर्व आरोपी पोलिसांच्या ताब्यात होते. आरोपींना पोलीस ठाण्यातून सोडून देणाऱ्या पोलिसांवर निलंबनाची कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी सोमवार दि. १५ जुलै २०२४ पासून आम्ही तासगाव पोलीस ठाण्यासमोर बेमुदत धरणे आंदोलन करणार आहोत.

# रांजणीचे 'गोट क्लस्टर' दहिवडीला हलवले

## रोहित पाटील यांचेकडून महायुती सरकारचा निषेध

**तासगाव :** सांगली जिल्ह्याच्या कवठेमहांकाळ तालुक्यातील रांजणी येथे प्रस्तावित असलेले गोट क्लस्टर (शेळी समूह योजना) सातारा जिल्ह्याच्या माण तालुक्यातील दहिवडी येथे सुरु करण्याचा निर्णय राज्यातील महायुती सरकारने घेतला आहे. याबाबतचा शासन निर्णय राज्याच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्य व्यवसाय विभागाच्या वतीने गुरुवारी घेण्यात आला आहे.

दरम्यान सुमारे १० कोटी रुपयांचा निधी मंजूर असलेले गोट क्लस्टर मतदारसंघातून पळवून नेणा-या महायुती सरकारचा तासगाव-कवठेमहांकाळ मतदारसंघाच्या वतीने निषेध करत आहोत, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे युवा नेते रोहित आर. आर. पाटील यांनी समाज माध्यमातून व्यक्त केली आहे.

राज्यस्तरीय योजनेंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या प्रक्षेत्रावर प्रत्येक महसूली विभागात एक शेळी समूह योजना (ञ्ेर्ीं उर्श्रीीेंशी डलहशाश) राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार पुणे महसूली विभागात रांजणी, ता. कवठेमहाकाळ, जि. सांगली येथे शेळी समूह योजना राबविण्यास मान्यता दिली होती. यासाठी तब्बल १० कोटी रुपयांचा निधीही मंजूर केला होता.

परंतू गुरुवारी सदरचे क्लस्टर (शेळी समूह योजना) रांजणी, ता. कवठेमहाकाळ, जि. सांगली येथील प्रक्षेत्राऐवजी दहिवडी, ता. माण, जि. सातारा येथील प्रक्षेत्रावर राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे, असा शासन निर्णय घेण्यात आला आहे.

याबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना रोहित पाटील म्हणाले, तासगाव - कवठेमहांकाळ मतदारसंघाच्या वतीने महायुती सरकारचा निषेध करत आहोत. महाविकासआघाडीचे सरकार असताना १९ एप्रिल २०२२ रोजी रांजणी येथे गोट क्लस्टर (शेळी समूह योजना) शासनाकडून मंजूर करण्यात आले होते. सरकारकडून सदरचे गोट क्लस्टर रांजणी ता. कवठेमहांकाळ येथून रद्द करून दहिवडी जि. सातारा येथे हलवले आहे.

सातारा जिल्ह्याला नवीन प्रकल्प व तरतूद देण्याऐवजी आमच्या मतदारसंघासाठी मंजूर असलेला निधी देणे हे शेतकरी बांधवांवर अन्याय करणारे आहे. सदर योजनेसाठी १० कोटी रुपये मंजूर करण्यात आले. सदरची योजना मंजूर करून घेत असताना शेतकऱ्यांसाठी घेतली होती. मात्र राजकीय आकसापोटी ही योजना कवठेमहांकाळ तालुक्यातून रद्द करण्यात आली. तासगाव - कवठेमहांकाळ मतदारसंघ येत्या काळात याला या अन्यायाला हद्दपार करेल.

# ना. रामदास आठवले यांच्याकडून सावळज शाळेला ५ संगणक प्रदान

## शाळेसाठी भरघोस मदत करणार : नानासाहेब वाघमारे



आरपीआयचे तासगाव तालुका अध्यक्ष प्रवीण धेंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या माध्यमातून सावळज येथील मराठी मुलींच्या शाळेत ५ संगणक प्रदान करण्यात आले. तसेच जि.प. मराठी मुलांच्या शाळेच्या नवीन इमारतीसाठी नामदार आठवले यांच्या माध्यमातून भरघोस मदत मिळवून देण्याचे आश्वासन प्रवीण धेंडे यांनी यावेळी बोलताना दिले.

**तासगांव :** सावळज (ता. तासगाव) येथील जिल्हा परीषद मुलींच्या शाळेत केंद्रीयमंत्री रामदास आठवले यांच्या खासदार विकास निधीतून ५ संगणक प्रदान करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते राजू कलाल यांचा पाठपुरावा व आरपीआयचे तालुकाध्यक्ष प्रवीण धेंडे यांचे विशेष प्रयत्न यामुळे सावळज जिल्हा परिषद मराठी मुलींच्या शाळेची संगणक लॅब सुसज्ज झाली आहे . आरपीआय पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष नानासाहेब वाघमारे यांच्या हस्ते संगणक प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सावळज गावच्या सरपंच मिनल पाटील होत्या. तर प्रमुख पाहूणे म्हणून रिपब्लिकन पक्षाचे वाहतूक आघाडी जिल्हाध्यक्ष मुन्ना कोकने उपस्थित होते.

यावेळी बोलताना नानासाहेब वाघमारे म्हणाले, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा सावळज गावाशी विशेष जिव्हाळा आहे. सावळज गावातच मंत्री आठवले यांचे बालपण व शिक्षण झाल्यामुळे गावातील कोणत्याही विकास कामाबाबत ते सकारात्मक असतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या स्पर्धेच्या युगात जागतिक दर्जाचे शिक्षण मिळणे आवश्यक आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या सुविधा शालेय जीवनापासून गावाकडील विद्यार्थ्यांना मिळायला हव्यात या उदात्त हेतूने आठवले साहेबांनी सावळजच्या शाळेला संगणक दिले आहेत. येणाऱ्या काळात मराठी मुलांच्या शाळेच्या इमारतीसाठी भरघोस निधी आठवले साहेबांच्या माध्यमातून आम्ही उपलब्ध करू असा विश्वास नानासाहेब वाघमारे यांनी व्यक्त केला.

यावेळी सरपंच मिनल पाटील, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अनिल थोरात, मा. उपसरपंच संजय थोरात, प्रवीण धेंडे यांनी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमास मा. उपसरपंच बाळासाहेब पोळ, ज्येष्ठ नेते संपत भिसे,विश्र्वशांती बौद्ध विहार अध्यक्ष महावीर धेंडे, पांडुरंग भिसे, बादल डावरे, पवन भिसे, मुलींच्या शाळा व्यवस्थापन समितीचे प्रविण पोळ यासह केंद्र प्रमुख अण्णासाहेब गायकवाड, मुख्याध्यापक उज्वला पाटील , सुखदेव पाटील, सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठया संखेने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर माळवदे तर आभार जाधव यांनी मानले.

# विशाळगड, हिंसाचार मनाला प्रचंड वेदना देणारा; खासदार शाहू महाराज

**कोल्हापूर :** विशाळगड येथील अतिक्रमणे हटवण्याच्या निमित्ताने झालेला हिंसाचार आमच्या मनाला प्रचंड वेदना देणारा असून घडलेल्या घटनेचा आम्ही तीव्र निषेध करतो. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचाराने प्रगल्भ असलेल्या कोल्हापूर जिल्ह्यात अशी घटना घडली, हे अत्यंत क्लेशदायक आहे,हिंसाचारामध्ये ज्या निष्पाप लोकांचे नुकसान झाले, त्यांना सरकारने तातडीने नुकसान भरपाई द्यावी. शिवाय मंगळवारी (दि.१६ रोजी) घटनास्थळी भेट देवून पाहणी करणार असल्याचे खासदार शाहू महाराज यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळवले आहे

खासदार शाहू महाराज यांनी पत्रकात म्हटलंय कि, प्रशासनाने विशाळगड प्रश्न गांभीर्याने घेऊन माजी खासदार संभाजीराजे व मुख्यमंत्री यांची भेट तसेच चर्चा घडवून आणावी अशा सूचना आम्ही जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलिस प्रमुखांना या घटनेपूर्वी दिल्या होत्या. परंतु, राज्यशासन, प्रशासन आणि पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याची योग्य ती खबरदारी गांभीर्याने घेतली नाही, त्यामुळे ही घटना घडली. हे जिल्हा प्रशासन व पोलिसांचे अपयश आहे. राज्य सरकारने रविवारी अतिक्रमण काढण्या संदर्भात जिल्हा प्रशासनाला जे आदेश दिले, तेच आदेश या पूर्वी दिले असते तर ही घटना टळली असती. या हिंसाचाराबाबत संबंधितांवर कारवाई करावी. माजी खासदार संभाजीराजे यांनी याप्रश्नी आंदोलनाचे नेतृत्व केले आणि सुरुवातीपासून आक्रमक भूमिका घेतली. परंतु त्यांच्या आक्रमक भूमिकेनंतर जो हिंसाचार झाला, त्याचा आम्ही स्पष्ट शब्दात तीव्र निषेध करतो. कोणत्याही समाजघटकांवर अन्याय होत असेल तर त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी आमची आहे. विशाळगडावरील अतिक्रमणे सरसकट काढण्याची कारवाई प्रशासनाने तातडीने करावी. त्या संदर्भात कोणताही दुजाभाव केला जाऊ नये. असंही त्यांनी पत्रकात म्हटले आहे.

# मागण्या पूर्ण झाल्यास लाडकी बहीण योजना कामावर बहिष्कार; अंगणवाडी सेविकांचा इशारा



**कोल्हापूर :** प्रलंबित मागण्यांसाठी अंगणवाडी सेविकांनी जिल्हा परिषदेवर मोर्चा काढत मुख्यमंत्री साहेब, आम्ही तुमच्या लाडक्या बहिणी नाही का? असा सवाल उपस्थित केला. भाजीत भाजी अंबाडी, सरकार करतंय लबाडी'यासारख्या घोषणा देत परिसर दणाणून सोडला. अतुल दिघे आणि सुवर्णा तळेकर यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला.

आशाची मानधनवाढ होताच तितक्याच मानधनवाढीचा प्रस्ताव मंत्रीमंडळात ठेवून मानधन वाढ करणे, सर्व अंगणवाडी सेविका मदतनीस यांच्यासाठी पेन्शनयोजना सुरू करणे, सर्व अंगणवाडी सेविकांना उपदान ग्रॅच्युईटी लागू करणे याबाबत कारवाई अद्यापही पूर्ण झालेली नाही. ती कार्यवाही करावी, वेतन लागू करण्यासंबंधीची चर्चा कृती समिती सोबत चर्चा करावी अशा विविध मागण्या यावेळी मोर्चेकऱ्यांनी केले.

दिघे म्हणाले, जानेवारी ते मार्च असा प्रदीर्घ संप केल्यानंतर ५ हजार रूपये मानधन वाढ मिळाली. परंतू उर्वरित मागण्यांबाबत लोकसभेची आचारसंहिता लागल्यानंतर मंत्री आदित तटकरे यांनी बैठक बोलावून उरलेल्या मुद्यांबाबत संघटनांशी चर्चा करणे आवश्यक होते. परंतू त्यांना वेळ मिळालेला नाही. याबाबत जर निर्णय झाला नाही तर लाडकी बहिण योजनेच्या कामावरही बहिष्कार घालण्यात येईल. असा इशारा यावेळी देण्यात आला. मोर्च्या मध्ये अंगणवाडी सेविका मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

# येत्या विधानसभेत गद्दारांना गाडण्यासाठी शिवसेना पक्ष सज्ज

## नृसिंहवाडी येथे इचलकरंजी- शिरोळ विधानसभा कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा संपन्न



**कुरुंदवाड :** दोन वर्षांपूर्वी ज्यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी गद्दारी केली त्या सर्व गद्दारांना गाड ण्यासाठी शिवसेना सज्ज झाली आहे. येत्या विधानसभा निवडणुकीत त्यांना निश्चित जागा दाखवु असा विश्वास शिवसेना नेते आमदार भास्कर जाधव यांनी येथे बोलताना व्यक्त केला

नृसिंहवाडी येथे आयोजित शिरोळ- इचलकरंजी विधानसभा मतदारसंघातील शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या संवाद मिळाव्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते .अध्यक्षस्थानी शिवसेनेचे उपनेते संजय पवार होते. यावेळी माजी आमदार उल्हास पाटील ,कोल्हापूर जिल्हा संपर्कप्रमुख आमदार अरुण भाई दुधवडकर ,महाराष्ट्र राज्य संघटक चंगेजखान पठाण, हाजी असलम सय्यद यांची प्रमुख उपस्थिती होती.

आमदार जाधव म्हणाले गद्दारांना पाडण्याचे काम नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत शिवसैनिकांनी करून दाखवले आहे .भारतीय जनता पार्टीची घमेंड उतरवली आहे. देशात चारसौ पार व राज्यात ४५ प्लस म्हणत होते त्यांना सतरा वर आणून ठेवले .आमच्या शिवसैनिकांना ईडी, सी. बी. आय., इन्कम टॅक्स, पोलिसांचा जाच ,एस. आय. टी चा त्रास देऊन बेजार केला होता. शिवसेना पक्ष फोडला आणि घमेंडी ने ते डरकाळी फोडत होते. त्यांना त्यांची जागा दाखवून दिली आहे .मात्र आजही त्यांची घमेंड कायम आहे ही येत्या विधानसभा निवडणुकीत हा पेटलेला शिवसैनिक त्यांना खाली उतरविल्याशिवाय राहणार नाही ,असा ठाम विश्वास यावी शेवटी जाधव यांनी व्यक्त केला.

स्वागत आणि प्रास्ताविक जिल्हाप्रमुख वैभव उगळे यांनी केले. यावेळी किशोर ठाणेकर दयानंद, मालवेकर, मलकारी लवटे मधुकर पाटील आदींची भाषणे झाली. प्रतिक धनवडे यांनी आभार मानले.

# कौशल्य प्रशिक्षणातून व्यावसायिक व उद्योजक बना; पालकमंत्री हसन मुश्रीफ

## आयटीआय व कोल्हापूर इंजीनियरिंग असोसिएशनच्यावतीने शिकवू उमेदवारांना निवडपत्रांचे वाटप



**कोल्हापूर ;** कोल्हापुरातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था ही एक नामांकित कौशल्य विकास संस्था आहे. या कौशल्य प्रशिक्षणातून स्वतः व्यावसायिक आणि उद्योजक बना, असे प्रतिपादन पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी केले. कोल्हापुरात जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त आयटीआय व कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनच्यावतीने आयोजित १२० शिकावू उमेदवारांना निवडपत्र वाटप कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

मंत्री मुश्रीफ म्हणाले, गेल्या अनेक वर्षापासून महाराष्ट्र राज्य सरकारची नोकर भरती विविध कारणांनी अडकली होती. यावर्षी ७५ हजार नोकर भरती होऊन विधानसभेच्या आचारसंहितेपूर्वी एक लाख नोकर भरतीचे सरकारचे उद्दिष्ट आहे. राज्य सरकारने नुकतीच युवा कौशल्य प्रशिक्षण विद्यावेतन योजना लागू केली आहे. यामध्ये आयटीआय व तंत्रशिक्षणातील पदविका झालेल्यांना दरमहा सहा हजार तर पदवीधर व पदवीधर व पदव्युत्तरांसाठी दरमहा दहा हजार मानधन आहे.

औद्योगिक व तांत्रिक प्रशिक्षणाच्या जोरावर स्वतःच्या पायावर उभे राहून उद्योग व्यवसाय सुरू करा. महाराष्ट्र सरकारकडून मदत व सहकार्यही मिळेल. सद्यस्थितीत हा सर्वोत्तम पेशा असल्याचे ही मंत्री मुश्रीफ यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी वाय. बी. पाटील, कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनचे अध्यक्ष बाळासो कोंडेकर, औद्योगिक शिक्षण संस्था कोल्हापूरचे प्राचार्य महेश आवटे, सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार महावीर बहिरशेठ, आयटीआयचे संस्था व्यवस्थापन अध्यक्ष संग्राम पाटील, भास्कर घोरपडे, संगीता खंदारे, अपूर्वा तेली, सतीश माने, राज येडके, मानसिंग भोसले, श्रावण निर्मळे यांच्यासह इतर मान्यवर शिकाऊ उमेदवार उपस्थित हो

# विशाळगड, हिंसाचार मनाला प्रचंड वेदना देणारा; खा.शाहू महाराज

## घटनास्थळी भेट देवून पाहणी करणार



**कोल्हापूर** - विशाळगड येथील अतिक्रमणे हटवण्याच्या निमित्ताने झालेला हिंसाचार आमच्या मनाला प्रचंड वेदना देणारा असून घडलेल्या घटनेचा आम्ही तीव्र निषेध करतो. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचाराने प्रगल्भ असलेल्या कोल्हापूर जिल्ह्यात अशी घटना घडली, हे अत्यंत क्लेशदायक आहे,हिंसाचारामध्ये ज्या निष्पाप लोकांचे नुकसान झाले, त्यांना सरकारने तातडीने नुकसान भरपाई द्यावी. शिवाय मंगळवारी (दि.१६ रोजी) घटनास्थळी भेट देवून पाहणी करणार असल्याचे खासदार शाहू महाराज यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळवले आहे

खासदार शाहू महाराज यांनी पत्रकात म्हटलंय कि, प्रशासनाने विशाळगड प्रश्न गांभीर्याने घेऊन माजी खासदार संभाजीराजे व मुख्यमंत्री यांची भेट तसेच चर्चा घडवून आणावी अशा सूचना आम्ही जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलिस प्रमुखांना या घटनेपूर्वी दिल्या होत्या. परंतु, राज्यशासन, प्रशासन आणि पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याची योग्य ती खबरदारी गांभीर्याने घेतली नाही, त्यामुळे ही घटना घडली. हे जिल्हा प्रशासन व पोलिसांचे अपयश आहे. राज्य सरकारने रविवारी अतिक्रमण काढण्या संदर्भात जिल्हा प्रशासनाला जे आदेश दिले, तेच आदेश या पूर्वी दिले असते तर ही घटना टळली असती. या हिंसाचाराबाबत संबंधितांवर कारवाई करावी.

माजी खासदार संभाजीराजे यांनी याप्रश्नी आंदोलनाचे नेतृत्व केले आणि सुरुवातीपासून आक्रमक भूमिका घेतली. परंतु त्यांच्या आक्रमक भूमिकेनंतर जो हिंसाचार झाला, त्याचा आम्ही स्पष्ट शब्दात तीव्र निषेध करतो. कोणत्याही समाजघटकांवर अन्याय होत असेल तर त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी आमची आहे. विशाळगडावरील अतिक्रमणे सरसकट काढण्याची कारवाई प्रशासनाने तातडीने करावी. त्या संदर्भात कोणताही दुजाभाव केला जाऊ नये. असंही त्यांनी पत्रकात म्हटले आहे.



# खिरेश्वर येथे वनविभागाच्यावतीने चेक पोस्टची उभारणी

नारायणगाव:- जून्नर तालुक्यातील खिरेश्वर तसेच किल्ले हरिश्चंद्रगडाच्या पायथ्याशी असलेली विविध पर्यटन स्थळे येथे पर्यटक निसर्गा अभ्यासक तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणावर फिरायला व ट्रेकिंग साठी येत असतात यामुळे येथील वन विभागाच्या हद्दीमधील वनसंपदा सुरक्षित रहावी तसेच सुरक्षित व जबाबदार पर्यटन व्हावं आणि नैसर्गिक संपदेची हानी होऊ नये यासाठी जुन्नर वनविभागाच्या वतीने खिरेश्वर येथे चेक पोस्ट उभारण्यात आले आहे आज सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक वनसंरक्षक अमित भिसे, वनक्षेत्रपाल वैभव काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे चेक पोस्ट उभारण्यात आले आहे. याप्रसंगी स्थानिक वन हक्क समिती चे पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य, वनविभागाचे वनपाल आर.डि.गवांदे, वनरक्षक कोमल डाखोरे , वनरक्षक आर. के.फुलवड तसेच वन कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्व. वल्लभ बेनके यांचा दातृत्वाचा वारसा अविरत सुरू ठेवणार : अमित बेनके



**नारायणगाव :** वारकरी सांप्रदायाची सेवा करून त्यांच्याशी घट्ट नाळ जोडण्याचे कार्य ज्येष्ठ नेते माजी आमदार स्व. वल्लभ बेनके यांनी सुरु केले होते. तोच वारसा, वसा व वारकरी सांप्रदायाच्या प्रती असलेली आस्था पुढे घेऊन यापुढेही आमदार अतुल बेनके व बेनके कुटुंबीय अखंडित सेवा कार्य सुरूच ठेवणार असल्याचे प्रतिपादन युवा नेते अमित बेनके यांनी केले.

माजी आमदार स्व. वल्लभ बेनके यांच्या जयंती निमित्त युवा नेते अमित बेनके यांच्या वाढदिवसाचे औचीत्य साधून दुसऱ्या टप्प्यात नारायणगाव व परिसरातील जिल्हा परिषद गटातील पुरुष व महिला भजनी मंडळांतील सुमारे २९९ जण व २३ वारकरी, जुन्नर येथील कोंडाजीबाबा डेरे आश्रम तसेच राजाराम पाटील वृद्धाश्रम येथे देखील वस्त्रदान व अन्नदान करण्यात आले. याकार्यक्रमाला कृषी भूषण अनिल मेहेर, ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष प्रकाश पाटे, श्रीराम पतसंस्थेचे अध्यक्ष शशिकांत वाजगे, संचालक अनिल थोरात, सुनील श्रीवत, अनिल डेरे, भाजपाचे नामदेव खैरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) शहराध्यक्ष शेखर ढवळे, उद्योजक संजय वारुळे, माजी सरपंच विकास दरेकर, अजिंक्यतारा पतसंस्थेचे अध्यक्ष गणेश वाजगे, रामदास अभंग, डी. के. भुजबळ, अशोक पाटे, बिशाल भुजबळ, सागर दरांदळे, मुकेश वाजगे, स्वप्नील डेरे, जुबेर आत्तार, ज्ञानेश्वर रासने, प्रवीण पाटे, ज्योती संते, ॲड. माधवी पोटे, ज्योती गांधी, छाया वाणी, भारती कानसकर, सुनंदा वाजगे, रत्नप्रभा तांबे, हिराबाई कोल्हे, कुंदा मेहेर, विमल गरुड, सुषमा चव्हाण, शिला खंडागळे आदी वारकरी संप्रदायाचे सदस्य उपस्थित होते.वल्लभ बेनके, आमदार अतुल बेनके, डॉ. अमोल बेनके यांनी वस्त्रदान व अन्नदानाचे आयोजन करून समाजप्रती ऋण व्यक्त केले.

## नवीन प्रशासन भवन शेजारी

# गुलमोहराचे झाड मुळासकट पडले कोलमडून

**सातारा :** सध्या सर्वत्र वृक्षारोपण करून सामाजिक भान राखले जात आहे. अशावेळी सातारा बस स्थानक शेजारील सामान्य प्रशासन भवन प्रवेशद्वारा नजीकचे गुलमोहराचे झाड उलमडून पडले आहे. सदर कार्यालय कामकाजाच्या वेळेला येणाऱ्या कर्मचाऱ्यांनी हे झाड लावून या ठिकाणी वृक्षारोपण केले होते. एका गुलमोहराच्या झाडाने चक्क भवन शेजारीच मान टाकलेली आहे.

प्रवेशद्वाराजवळच पडल्यामुळे अद्यापही ते बाजूला करण्याचे काम सुरू झालेले नाही. शासकीय अनेक कार्यालय म्हणजे गुप्तवार्ता विभाग, रोजगार व कौशल्य विकास, जिल्हा माहिती कार्यालय, वाहतूक विभाग, कौटुंबिक न्यायालय, प्रदूषण नियंत्रण मंडळ, उपनिबंधक कार्यालय, कृषी कार्यालय, आत्मा, अशी महत्त्वाची कार्यालय या इमारतीत असल्यामुळे नियमित नागरिकांची वर्दळ होते. आवारातील हे गुलमोहराचे झाड मुळासकट उन्मळून पडले आहे वास्तविक पाहता या ठिकाणी अनेक कर्मचारी आपली वाहने उभी करतात. त्या बाजूला ते न पडता इमारतीच्या बाजूला पडल्यामुळे कुठलेही नुकसान झाले नाही. या ठिकाणी रॅम असून दिव्यांग कर्मचारी आपले वाहन लावतात.